**L. A. BILL No. XXVI OF 2022.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATIVE COUNCIL (CHAIRMAN AND DEPUTY CHAIRMAN) AND MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY (SPEAKER AND DEPUTY SPEAKER) SALARIES AND ALLOWANCES ACT, THE MAHARASHTRA MINISTERS' SALARIES AND ALLOWANCES ACT, THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' SALARIES AND ALLOWANCES ACT AND THE LEADERS OF OPPOSITION IN MAHARASHTRA LEGISLATURE SALARIES AND ALLOWANCES ACT, 1978.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६.**

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

एचबी ९९५—१

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९५६ चा ४७. १९५६ चा ४८. १९५६ चा ४९. १९७८ चा महा. ८.

प्रकरण-एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, १ एप्रिल २०२२ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण-दोन

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा.**

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १२ब ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियमाच्या कलम १२ब मध्ये, पोट-कलम (१) मधील, " राज्य शासनाकडून दरमहा रुपये २५,००० एवढे " या मजकुराऐवजी, " राज्य शासनाने, वेळोवेळी काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे दरमहा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा ४७.

प्रकरण-तीन

**महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा.**

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १०क ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियमाच्या कलम १०क मध्ये, पोट-कलम (१) मधील, " राज्य शासनाकडून दरमहा रुपये २५,००० एवढे " या मजकुराऐवजी, " राज्य शासनाने, वेळोवेळी काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे दरमहा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा ४८.

प्रकरण-चार

**महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा.**

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (३) मधील, " राज्य शासनाकडून दरमहा रुपये २५,००० एवढे " या मजकुराऐवजी, " राज्य शासनाने, वेळोवेळी काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे दरमहा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा ४९.

प्रकरण-पाच

## महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याची सुधारणा.

१९७८ चा महा. ८.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

**५.** महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याच्या कलम १०अ मध्ये, पोट-कलम (१) मधील, “ राज्य शासनाकडून दरमहा रुपये २५,००० एवढे ” या मजकुराऐवजी, “ राज्य शासनाने, वेळोवेळी काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे दरमहा ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६.]**

**[महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
संसदीय कार्य मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.